महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड इमारत, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.
Email Id: contact-secretary@mpsc.gov.in Website: https://mpsc.gov.in, https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc ०२२-६९३८५९००

क्रमांक: सीएमए-०४२६/प्र.क्र.४२/२०२६/जाहिरात दिनांक : २७ नोव्हेंबर, २०२६

-: प्रसिद्धिपत्रक :-

विषय :- (१) **महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा- २०२६, जाहिरात क्रमांक ०१७/२०२६, दिनांक २५ जून, २०२६**
(२) दिनांक ०६ नोव्हेंबर, २०२६ रोजीचे शुद्धिपत्रक.
(३) दिनांक २७ नोव्हेंबर, २०२६ रोजीचे शुद्धिपत्रक.

शासनाच्या विविध विभागाकडून प्राप्त मागणीपत्रानुसार महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२६ करीता दिनांक २५ जून, २०२६ रोजी जाहिरात (जाहिरात क्रमांक ०१७/२०२६) प्रसिद्ध करण्यात आली आहे. जाहिरात प्रसिद्ध केल्यानंतर आयोगास प्राप्त झालेल्या अतिरिक्त मागणीपत्रांचा जाहिरातीमध्ये समावेश करण्यासाठी दिनांक ०६ नोव्हेंबर, २०२६ रोजी शुद्धिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे आणि त्यानुसार अर्ज स्वीकारण्यात येत असून अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक २७ नोव्हेंबर, २०२६ असा निश्चित करण्यात आला आहे.

२. दरम्यान, शासन पत्र कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, क्रमांक : व्यशिअ-२०२६/इ.क्र.१८५३७०३/व्यशि-१, दिनांक २७ नोव्हेंबर, २०२६ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त अभिप्रायानुसार समतुल्य शैक्षणिक अर्हतांच्या संदर्भात दिनांक २७ नोव्हेंबर, २०२६ रोजी शुद्धिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. यास्तव, प्रस्तुत परीक्षेकरीता अर्ज सादर करण्यास पात्र उमेदवार वंचित राहू नये, याकरीता अर्ज सादर करण्यास खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे:-

अ.क्र.	तपशील	विहित कालावधी
०१	**अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक**	**दिनांक २९ नोव्हेंबर, २०२६ रोजी २३.५९ वाजेपर्यंत**
०२	**ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक**	**दिनांक ३० नोव्हेंबर, २०२६ रोजी २३.५९ वाजेपर्यंत**

उप सचिव (जाहिरात)
ठिकाण :- नवी मुंबई महाराष्ट्र लोकसेवा आयोग